महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे ●

शनिवार दि.१६ मे २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ अंक : २६८ | किंमत २ रुपये | 7499615933

**प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे**

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

# न्यू इंग्लिश स्कूल साकेगावमध्ये निकाल फेरफार धमकी व चौकशी अहवाल दडपल्याचे गंभीर आरोप

## मुख्याध्यापक गीताराम वाघ यांच्यासह संबंधितांवर कारवाईची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

साकेगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या निकालात फेरफार, पालकांना धमक्या, तसेच चौकशी अहवालातील महत्त्वाचे पुरावे दडपल्याचे गंभीर आरोप समोर आले असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका उपाध्यक्ष श्री. लक्ष्मण आश्रू डांगे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडे स्वतंत्र निवेदने देऊन सखोल चौकशीची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, श्री. डांगे यांची मुले न्यू इंग्लिश स्कूल साकेगाव येथे इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत होती. नुकताच जाहीर झालेल्या निकालामध्ये त्यांचा मुलगा प्रथमेश लक्ष्मण डांगे याचा निकाल जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच मुलगी प्रतीक्षा लक्ष्मण डांगे हिच्या गुणपत्रिकेमध्ये अनेक त्रुटी करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.तक्रारीमध्ये मुख्याध्यापक



गीताराम वाघ व संबंधित वर्गशिक्षकांनी संगनमत करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदींमध्ये फेरफार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. गुणपत्रिकेमध्ये चुकीचे विषय, गुणांमध्ये विसंगती तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर परिणाम होईल अशा चुका जाणीवपूर्वक करण्यात आल्याचा दावा पालकांनी केला आहे. यापूर्वी शाळेमध्ये शैक्षणिक शुल्क व इतर गैरप्रकारांबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे तक्रार करण्यात आली होती. त्या अनुषंगाने चौकशी समिती नेमण्यात आली होती. समितीने विद्यार्थी व पालकांचे लेखी जबाब घेतले होते. मात्र अंतिम चौकशी अहवालामध्ये अनेक विद्यार्थ्यांचे व पालकांचे जबाब गायब करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

श्री. डांगे यांनी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात, तक्रारी मागे घ्याव्यात अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा प्रकारच्या धमक्या मिळत असल्याचाही आरोप केला आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.या संपूर्ण प्रकरणामुळे पाथर्डी तालुक्यातील शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली असून पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### निवेदना मधील प्रमुख मुद्दे

* विद्यार्थ्यांच्या निकालात फेरफार केल्याचा आरोप
* प्रथमेश डांगे याचा निकाल प्रलंबित ठेवल्याची तक्रार
* प्रतीक्षा डांगे हिच्या गुणपत्रिकेत त्रुटी
* चौकशी समितीच्या अहवालातून लेखी जबाब गायब केल्याचा आरोप
* मुख्याध्यापक गीताराम वाघ व संबंधित शिक्षकांवर संगनमताचा ठपका
* पालकांना धमकी दिल्याचा गंभीर आरोप
* जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हा परिषदेकडे सखोल चौकशीची मागणी

# कु.जयश्री पाटील हिचा अभिनंदनपर कौतुक सोहळा संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

काल दि. १४ मे रोजी महाराष्ट्र राज्यात छत्रपती संभाजीनगर विभागातून १२वी बोर्ड परीक्षेत मराठी विषयात ९९ गुण घेऊन राज्यात सर्वप्रथम आलेली कु.जयश्री देविदास पाटील हिचे कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. शारदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्या मंदिर, वरूड बु. ता. भोकरदन जि. जालना या विद्यालयात जयश्री चे पाचवी ते बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण झाले त्याच ठिकाणी जाऊन तिचे प्रत्यक्ष अभिनंदन केले. तिच्या बरोबर तिचे मार्गदर्शक शिक्षक स्वतः तिची आई प्रा. सौ मनीषा पाटील आणि वडील डॉ. श्री.डी.बी. पाटील या दोघांचाही उचित असा सन्मान महासंघाच्या वतीने करण्यात आला.

हा अभिनंदनीय सोहळ्यासाठी महासंघाच्या वतीने
अध्यक्ष -प्रा. सुनील डिसले (बारामती)






कार्याध्यक्ष - डॉ. मनीषा रिठे (वर्धा)
समन्वयक आणि मुख्य नियामक
डॉ. राजेंद्र सोनवणे (जालना)
नागपूर जिल्हा प्रतिनिधी/अध्यक्ष
प्रा. सुरेश नखाते (नागपूर)
वर्धा जिल्हा प्रतिनिध/अध्यक्ष
प्रा. गिरीश काळे (वर्धा)
बीड जिल्हा प्रतिनिधी/अध्यक्ष
डॉ. आत्माराम झिंजुर्डे (बीड)
इत्यादी राज्य आणि जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते.

याप्रसंगी सर्व प्रतिनिधींनी थोडक्यात पण प्रेरणादायी अशी मनोगते व्यक्त केली. शिवाय प्रथम आलेल्या जयश्रीची उत्तम अशी मुलाखत कार्याध्यक्षा डॉ. मनीषा रिठे मॅडम यांनी घेतली. याप्रसंगी जयश्रीचे सर्व कुटुंबीय, शाळेतील सर्व शिक्षक आणि पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते.जयश्रीच्या पालकांकडून कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघातील उपस्थित असणाऱ्या कार्यकारणीच्या सर्व सदस्यांचा उचित असा सन्मान करून सर्वांना स्नेहभोजन देऊन पाहुणचारही केला. या सर्व प्रसंगाची काही क्षणचित्र आणि मनोगते पाठवत आहे.

# उर्वरित शेतकऱ्यांचा पिक विमा तात्काळ अदा करा-कैलास येसगे कावळगावकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । वंकलवार प्रभू**

खरीप-२०२५ चा पिक विमा एप्रिल महिन्यातच मंजूर करण्यात आला. नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्याला सर्वाधिक पिक विमा मंजूर झाल्याच्या घोषणाही केल्या गेल्या. पण मरखेल, देगलूर व खानापूर महसूल मंडळातील शेतकऱ्यांच्या खात्यात एक दमडीही आजतागायत जमा झाली नाही. यामुळे अस्वस्थ शेतकऱ्यांनी काँग्रेस पक्षाचे जिल्हा प्रवक्ते तथा शेतकरी नेते कैलास येसगे कावळगावकर यांच्या नेतृत्वाखाली उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करून कृषी व महसूल प्रशासन अन् विमा कंपनीच्या प्रतिनिधींकडे सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात प्रामुख्याने उर्वरित शेतकऱ्यांचा पिक विमा तात्काळ अदा करावा; अन्यथा उग्र स्वरूपाचे आक्रमक आंदोलन केले जाईल असा धमकी वजा इशारा प्रशासनाला दिला. तसेच खरीपसाठी लागणारे खतं-बियाणे योग्य दरात उपलब्ध



करून देण्याचीही मागणी करण्यात आली. याप्रसंगी नायब तहसीलदार विलास तेलंग यांनी पुढाकार घेत कृषी अधिकारी एम.जी. सोनकांबळे, विमा कंपनीचे प्रतिनिधी यांच्यासोबत तात्काळ बैठक घेऊन पुढील आठवडाभरात पिक विमा वितरित करण्याबाबत सकारात्मक चर्चा घडवून आणली.या धरणे आंदोलनाला कैलास येसगे कावळगावकर यांच्यासह जयदीप वरखिंडे, शिवसेनेचे महेश पाटील अल्लापूरकर, भरत पाटील, अरविंद देशमुख, व्यंकट पाटील झरीकर, उमेश पाटील आडलूरकर, भास्कर पाटील, मुन्ना पाटील भोकसखेडकर, भागवत पाटील सोमूरकर, विलास रेड्डी यालावार, निशिकांत कांबळे, दिलीप मरकंटे, सुभाष अल्लापुरकर, यादवराव बोरगावकर, गोपाळ मोरे, सुर्याजी पाटील भक्तापूरकर, सुधाकर जबडे, बाळासाहेब बाबरे, श्रीपत बोडके, सुनील शिंदे, योगेश थडके, बालाजी पाटील डुकरे, गोविंद कोठारे, विठ्ठलराव भोसले, बालाजी वळंकीकर, बंडू बिरादार, शिवलिंग येसगे, बसवंत पटणे, शिवाजी बिरादार, माधव लगडे, सदाशिव वरखिंडे, नंदकिशोर पाटील, प्रशांत पाटील, शादुल पटेल, माधवराव पाटील, रामराव मोरे, बळीराम बामणे, मारुती पाशमवार, सुभाष वद्देवार व अनेक शेतकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# हिप्परगा येथून 'जलसमृद्ध एकात्मिक विकास अभियान' अंतर्गत मोफत आरोग्य शिबिराचा शुभारंभ

## सात वर्षांत औसा तालुक्यातील ७० गावांचा होणार परिपूर्ण विकास-आ.अभिमन्यू पवार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**

औसा तालुक्यातील ७० गावांचा सात वर्षांच्या कालावधीत जलसमृद्ध आणि एकात्मिक पद्धतीने परिपूर्ण विकास करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प आपण हाती घेतला असून या अभियानाची सुरुवात पायलट प्रोजेक्ट म्हणून सात गावांपासून करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत गावांचा केवळ पायाभूत विकास नव्हे तर आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा, महिलांचे आरोग्य, व्यसनमुक्ती, दिव्यांग कल्याण आणि सामाजिक सक्षमीकरण अशा विविध अंगांनी सर्वांगीण विकास साधला जाणार आहे.



या अभियानांतर्गत औसा तालुक्यातील हिप्परगा (क) येथे भव्य आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत भास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते पाटील, क्रिएटिव्ह फाउंडेशन चे अध्यक्ष परीक्षित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

अभियानांतर्गत सात गावांतील प्रत्येक नागरिकाची सखोल आरोग्य तपासणी करण्यात येणार असून तब्बल ७२ विविध वैद्यकीय तपासण्यांद्वारे नागरिकांच्या आरोग्याची माहिती संकलित केली जाणार आहे. तपासणीत दुर्धर आजार आढळलेल्या रुग्णांवर पुणे आणि मुंबई येथील नामांकित रुग्णालयांमध्ये मोफत उपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत. प्रत्येक नागरिकासाठी डिजिटल आरोग्य कार्ड तयार करण्यात येणार असून ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी १० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देणारी 'वयवंदना योजना' प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

महिलांच्या आरोग्यावर विशेष भर देत तोंडाचा कर्करोग, स्तन कर्करोग आणि गर्भाशय कर्करोग तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणे, कुपोषणमुक्तीसाठी जनजागृती, शाळा आणि अंगणवाड्यांमधील पौष्टिक आहार तपासणी, व्यसनमुक्ती पथके, दिव्यांग बांधवांना साहित्य वाटप, ढइ मुक्त गाव अभियान, शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, एकल महिलांची आरोग्य तपासणी आणि सर्व महिलांना रक्तगट कार्ड वितरण असे अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम अभियानांतर्गत राबविले जाणार आहेत.निरोगी गाव, सक्षम कुटुंब आणि आरोग्यदायी समाज घडविण्याच्या दिशेने हे अभियान अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, अशी भावना व्यक्त केली.

या आरोग्य शिबिरासाठी पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, शोभा अभिमन्यू पवार, उपसभापती अमोल पाटील, बाजार समिती सभापती चंद्रशेखर सोनावणे, जिल्हा परिषद सदस्या दिपाली भोसले, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनशाम अडसूळ, सरपंच संतोष गोरे, उपसरपंच बालाजी म्हेत्रे, चेअरमन व्यंकट पाटील तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय वारकरी भूषण पुरस्काराने ह.भ.प.श्री.लक्ष्मण महाराज वाघ व मा. श्री त्रिसिंग जायभाये यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित



लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ.संभाजीनगर । डॉ.ज्ञानदेव चेपटे**

छत्रपती संभाजीनगर-तळागळातील जनतेच्या प्रश्नांना न्याय देत,समाजहिताची निर्भीड पत्रकारिता करत आणि सामाजिक बांधिलकी जपत अल्पावधीतच राज्यभरात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या दैनिक लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आले.भव्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा रविवारी अत्यंत दिमाखदार, उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. परळी वैद्यनाथ येथील हॉटेल भागवत पॅलेस येथे झालेल्या या सोहळ्याला महाराष्ट्रभरातील सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, डॉक्टर, शिक्षक, साहित्यिक, कलाकार, प्रशासकीय अधिकारी, वारकरी, शेतकरी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जगप्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी प्रसिद्ध अभिनेत्री, प्रबोधनकार व एकपात्री नाटककार सौ. मेघना संजय झुझम, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आशोक थोरात, परळी शहरचे पोलिस निरीक्षक श्री. नाचन, जी.व्ही.टी. संस्थापक मयंक गांधी, नायब तहसीलदार पठाण मॅडम,मार्गदर्शक परळी शहराच्या नगराध्यक्षा धर्माधिकारी मॅडम,यांची विशेष उपस्थिती लाभली.

दैनिक लोकनेताचे मुख्य संपादक मा.श्री. ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी कार्यक्रमाचे अत्यंत उत्कृष्ट नियोजन करत संपूर्ण आयोजनाची धुरा समर्थपणे सांभाळली. सहसंपादक अण्णासाहेब साबळे, निवासी संपादक प्रदीप मुंडे, उपसंपादक विजय रोडे,जिल्हा-प्रतिनिधी डॉ.ज्ञानदेव चेपटे, छ.संभाजीनगर, हनुमंत गुट्टे प्रतिनिधी व प्रविण फड, ज्ञानेश्वर जगताप भोकरदन प्रतिनिधी यांनीही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आडगाव येथील विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान ह.भ.प. श्री. लक्ष्मण महाराज वाघ यांना धार्मिक प्रबोधन, हरिपाठ आणि कीर्तन सेवेसाठी वारकरी भूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले,हा पुरस्कार पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने आणि प्रसिद्ध अभिनेत्री मेघना झुझम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.तर मा.श्री. त्रिसिंग जायभाये यांना ग्रामीण प्रश्नांवर सातत्याने निर्भीड लेखणी चालवत समाज हिताची पत्रकारिता केल्याबद्दलराज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारप्रदान करण्यात आला.हा पुरस्कार पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने आणि प्रसिद्ध अभिनेत्री मेघना झुझम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.त्यांच्या सामाजिक, आध्यात्मिक व पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सर्व स्तरांतून व ह.भ.प रवी महाराज वाघ,ह.भ.प.प्रल्हाद महाराज यांनी अभिनंदन केले व परिसरातून कौतुक होत आहे.शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.या मानाच्या पुरस्काराबद्दल दोन्ही मान्यवरांचे हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा.राज्यभरातील नागरिक, वाचक, सामाजिक कार्यकर्ते आणि तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लोकनेता परिवाराच्या सामाजिक बांधिलकीला भरभरून दाद दिली



## राष्ट्रीय बंजारा महासंघाच्या औसा तालुकाध्यक्ष पदी संतोष चव्हान यांची निवड

# गाडवेवाडी तांडा गावचे सुपुत्र संतोष चव्हान यांच्या अध्यक्ष निवडीबद्धल सत्कार संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**

औसा तालुक्यातील गाडवेवाडी तांडा गावचे सुपुत्र संतोष बाबु चव्हान यांची राष्ट्रीय बंजारा महासंघाच्या औसा तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली ,संतोष चव्हान यांनी सोशल मिडीया माद्यमातुन समाजसेवा करत जनजाग्रती केल्याने व संतोषला अगदी लहानपणापासुन समाजकार्याची आवड असल्याने त्यांची लोकाप्रती सदभावणा व समाजासाठी असलेली तळमळ पाहता राष्ट्रिय बंजारा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष भिकण रामदास जाधव ,संस्थापक प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक पी,टी चव्हान ,प्रदेश कार्याध्यक्ष मधुकर आनंदा जाठोत. युवक प्रदेश महेश चव्हाण.सह प्रदेश सरचिटणीस आमोलभाउ पवार यांच्या नेत्रत्वाखाली समाजहितासाठी व समाजकार्यासाठी संतोष चव्हान यांच्या



खांद्यावर औसा तालुकाध्यक्ष पदाची धुरा देण्यात आली आहे ,आज गाडवेवाडी तांडा येथील दैवत जगदंब मंदिरामध्ये ग्रामस्थांनी संतोष चव्हान यांचा यथोचीत सत्कार केला यावेळी

रमाकांत चव्हाण ,गुलाब तुकाराम राठोड.. गुलाब राठोड ,सरपंच हिरोजी राठोड ,बालाजी राठोड निलेश राठोड ,सुरेश राठोड अनिल राठोड ,सतीश राठोड पवन राठोड ,देविदास राठोड दीपक राठोड ,सुरेश राठोड ,पिंटू राठोड ,बाबू पवार ,विलास राठोड. बाळासाहेब भारती. श्रीकांत चव्हाण.वसंत राठोड. शुभम चव्हाण.राहुल पवार.वैजनाथ राठोड. सुरेश चव्हाण..

सह ग्रामस्थांनी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला

# दहावी बारावी गुणवंत कन्यांचा हरडफ येथे सन्मान; हिंदवी स्वराज्य संघटनेचा उपक्रम

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून हिंदवी स्वराज्य संघटनेच्या वतीने हरडफ (ता. हदगाव) येथील दहावीच्या व बारावीच्या परीक्षेत देदीप्यमान यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. आपल्या कर्तृत्वाने आई-वडिलांचे आणि गावाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या या कन्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

याप्रसंगी इयत्ता दहावीमध्ये भरघोस गुण मिळवून यशस्वी झालेल्या *कु. रिया राजू पाटील मोरे,बारीवी मध्ये ९२%घेऊन यश प्राप्त केलं दहावी मध्ये कु. शिवकन्या दत्ता मोरे, कु. संचिता गजानन शिंदे, कु. संध्या राजू जाधव आणि कु. वेदिका भगोराव सूर्यवंशी* यांचा विशेष सत्कार करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या सत्कार समारंभाला हरडफ सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन *नागोराव पाटील, तसेच **राजू पाटील मोरे, अविनाश पाटील मोरे, कृष्णा पाटील हरडफकर, दिगंबर पाटील जाधव आणि रुपेश पाटील सूर्यवंशी* यांची प्रमुख उपस्थिती होती.

छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा वारसा जपत, ग्रामीण भागातील मुलींनी शिक्षणात घेतलेली ही भरारी कौतुकास्पद असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमामुळे गावात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून या यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे





# कोरडगाव येथे अवैध वृक्षतोडीवर वनविभागाची कारवाई; लाकूड वाहतूक करणारे वाहन जप्त

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

पाथर्डी वनपरिक्षेत्र अंतर्गत कोरडगाव परिसरात अवैधरित्या वृक्षतोड करून लाकूड वाहतूक करणाऱ्या वाहनावर वनविभागाने धडक कारवाई करत वाहनासह लिंब प्रजातीच्या वृक्षांचे ओंडके जप्त केले. ही कारवाई पाथर्डी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. मिलिंद गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

वनविभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कोरडगाव परिसरात अवैध वृक्षतोड करून लाकूड वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. मिलिंद गोवेकर यांच्या सूचनेनुसार वनकर्मचाऱ्यांनी सापळा रचून संबंधित वाहनाची तपासणी




केली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये जळावू अनगड असलेले लिंब प्रजातीची वृक्षांचे ओंडके आढळून आले.

यावेळी वाहन चालकाकडे आवश्यक परवानगी व कागदपत्रांची मागणी करण्यात आली असता समाधानकारक माहिती न दिल्याने वनविभागाने वाहन ताब्यात घेतले. संबंधित आरोपींविरोधात वन अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास वनविभागाकडून करण्यात येत आहे.

सदर कारवाई मा उपवन रक्षक श्री धर्मवीर सालीविठ्ठल साहेब व सहाय्यक वनसंरक्षक श्रीमती ए. आर. दिघे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी वनपरीक्षेत्र अधिकारी अधिकारी मिलिंद गोवेकर वनपाल बबनराव मंचरे वन परिमंडळ अधिकारी संदीप एकबोटे, वनरक्षक बाळकृष्ण बडे वाहन चालक शिवनाथ जिवढे यासह वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. अवैध वृक्षतोड व जंगल संपत्तीची चोरी करणाऱ्यांविरोधात वनविभाग कठोर कारवाई करणार असल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# एसएससी परीक्षेत विशेष प्राविण्यासह नर्मदा सरकाटे हिचे यश

## गणित विषयात मिळविले १०० पैकी १०० गुन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव । विजय थोरात**

महागाव तालुक्यातील आंबोडा येथील रहिवासी तथा सकाळ वृत्तपत्राचे ग्रामीण प्रतिनिधी जगदीश सरकाटे यांची कन्या कु. नर्मदा लक्ष्मीकांत सरकाटे हिने इयत्ता दहावीच्या एसएससी परीक्षेत विशेष प्राविण्यासह उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

मातोश्री इंग्लिश मीडियम स्कूल, महागाव येथील विद्यार्थिनी असलेल्या नर्मदाने ९४.४० टक्के गुण मिळवत गणित विषयात तब्बल १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. ट्युशन अथवा कोचिंग क्लासेसचा आधार न घेता स्वअध्ययन व सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तिने हे यश मिळविले आहे.

नर्मदाच्या या यशाबद्दल महागाव तालुका मराठा सेवा संघाचे अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष उदय भाऊ नरवाडे (पाटील )यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी नर्मदाच्या पुढील शैक्षणिक



वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

तिच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रामसागर येथे संशयित एचटीबीटी कापूस बियाण्यांवर धाड; ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त.

# कृषी विभागाच्या भरारी पथकाची कारवाई;बियाणे कायद्यासह विविध कलमांअंतर्गत गुन्हा दाखल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेवा पवार । गडचिरोली**

चामोर्शी तालुक्यातील रामसागर येथे संशयित अनधिकृत एचटीबीटी (HTBT) कापूस बियाण्यांची अवैधरित्या साठवणूक व विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत संशयित कापूस बियाण्यांची ३७ पाकिटे, सीलिंग मशीन तसेच कोरे पॅकेट असा एकूण ३५ हजार ४३७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १४ मे २०२६ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत कृषी विभागाच्या पथकाने सापळा रचून रामसागर येथील संशयित ठिकाणी छापा टाकला. यावेळी पुष्पा, बलवान व मालामाल या वाणांच्या संशयास्पद कापूस बियाण्यांची ३७ पाकिटे आढळून







आली. यासोबतच बियाणे पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे सीलिंग मशीन आणि कोरे पॅकेटही जप्त करण्यात आले. जप्त बियाण्यांची किंमत ३३ हजार ९३७ रुपये असून सीलिंग मशीनची अंदाजे किंमत १ हजार ५०० रुपये असल्याचे कृषी विभागाने सांगितले.

या प्रकरणी देवेंद्र सदाशिव वन्नेवार, रा. रामसागर यांच्या विरोधात चामोर्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी म्हणून कृषी अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण) चेतन चलकलवार यांनी तक्रार दिली आहे. आरोपीविरुद्ध बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाई जिल्हास्तरीय भरारी पथकाने स्थानिक गुन्हे शाखा आणि चामोर्शी पोलीस स्टेशनच्या सहकार्याने केली. कारवाईत मोहीम अधिकारी आनंद पाल, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक संजय मेश्राम, कृषी अधिकारी चेतन चलकलवार तसेच पोलीस विभागाकडून सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. एस. बनसोडे आणि पोलीस अंमलदार राहुल रामटेके यांनी सहभाग घेतला.

ही कारवाई कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे, मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रविण देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रीती हिरळकर, कृषी विकास अधिकारी किरण खोमणे तसेच तालुका कृषी अधिकारी अमित तुमडाम यांचे मार्गदर्शन लाभल्याचे कृषी विभागाने कळविले आहे.

## आदर्श दाम्पत्याचा प्रेरणादायी प्रवास

# सरपंच उषाताई मापारी आणि रोजगार सेवक दिनकर मापारी यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

मुरमा (ता. पैठण) गावच्या विकासासाठी अहोरात्र झटणारे, गावातील प्रत्येकाच्या सुख-दुःखात कायम खंबीरपणे उभे राहणारे, सर्वांच्या मनात आपलेपण जपणारे आदरणीय सरपंच सौ. उषाताई दिनकर पाटील मापारी आणि रोजगार सेवक दिनकर पाटील मापारी यांना लग्नाच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

लग्न म्हणजे केवळ दोन व्यक्तींचे नाते नसून दोन मनांचे, दोन कुटुंबांचे आणि दोन विचारांचे सुंदर मिलन असते. विश्वास, प्रेम, समजूतदारपणा आणि त्याग या चार गोष्टींवर संसाराचा पाया उभा असतो. अशाच प्रेमळ, संयमी आणि समाजहिताची जाणीव असलेल्या या दाम्पत्याचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. सन २००६ मध्ये विवाहबंधनात अडकलेले उषाताई आणि दिनकरराव यांनी संसाराची सुरुवात अत्यंत साधेपणाने केली. काळाच्या ओघात अनेक चढ-उतार आले, संकटे आली, संघर्षही झाला; पण त्यांनी प्रत्येक परिस्थितीला धैर्याने सामोरे जात आपल्या नात्यातील विश्वास कधीही कमी होऊ दिला नाही. आज त्यांच्या संसारवेलीवर दोन गोंडस अपत्यांची फुले उमलली असून, त्यांचे कुटुंब आनंद, प्रेम आणि संस्कारांनी भरलेले आहे.

दिनकर पाटील मापारी यांनी रोजगार सेवक म्हणून गावाच्या विकासासाठी सातत्याने काम केले. गावातील अनेक गरजू कुटुंबांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले. सामान्य माणसांच्या समस्या समजून घेत त्यांचे निराकरण करण्यासाठी ते नेहमी तत्पर राहिले. त्यांच्या साधेपणामुळे आणि मनमिळावू स्वभावामुळे गावातील प्रत्येक व्यक्ती त्यांच्यावर प्रेम करते. त्याचप्रमाणे सरपंच म्हणून उषाताईंनी गावाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गावातील रस्ते, पाणी, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. महिलांनी समाजकारणात पुढे यावे, स्वतःची ओळख निर्माण करावी आणि गावाच्या विकासात योगदान द्यावे, यासाठी त्या कायम प्रेरणा



देत असतात. पतीप्रमाणेच पत्नीही समाजहित जपणारी आणि लोकांसाठी धावून जाणारी असल्यामुळे ही जोडी सर्वांच्या मनात विशेष स्थान निर्माण करून आहे. गावातील कोणत्याही व्यक्तीच्या घरी आनंदाचा क्षण असो किंवा दुःखाची वेळ असो, मापारी दाम्पत्य नेहमी मदतीसाठी पुढे असते. एखाद्या कुटुंबावर संकट आले तर आधार देणे, गरीब विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, गावातील सामाजिक सलोखा टिकवून ठेवणे अशा अनेक कामांमुळे त्यांच्याविषयी लोकांच्या मनात आदराची भावना निर्माण झाली आहे. राजकारणात यशस्वी होत असतानाही त्यांनी माणुसकीचा धागा कधी तुटू दिला नाही. सत्ता किंवा पदाचा गर्व न करता सर्वसामान्यांशी आत्मीयतेने वागणे, प्रत्येकाशी नम्रतेने बोलणे आणि लोकांच्या अडचणी समजून घेणे हे त्यांचे खरे वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच मुरमा गावातील सर्वांच्या हृदयात ही जोडी सर्वाधिक लाडकी जोडी म्हणून ओळखली जाते. आज त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या संसारातील प्रेम, जिव्हाळा आणि एकमेकांप्रती असलेला आदर पाहून प्रत्येकाला आनंद वाटतो. संसार सुंदर होण्यासाठी एकमेकांची साथ, समजूतदारपणा आणि त्याग किती महत्त्वाचा असतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे उषाताई आणि दिनकरराव यांचे जीवन होय. ईश्वराने त्यांच्या आयुष्यात सदैव आनंद, आरोग्य, समाधान आणि भरभराट ठेवावी. त्यांनी समाजसेवेचा घेतलेला वसा असाच कायम राहो. त्यांच्या संसारात प्रेमाचे, विश्वासाचे आणि सुखाचे रंग अधिकाधिक खुलत राहोत. त्यांच्या दोन्ही अपत्यांना उज्ज्वल भविष्य लाभो आणि हे संपूर्ण कुटुंब सदैव आनंदी राहो, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना. पुन्हा एकदा आदरणीय सरपंच सौ. उषा दिनकर पाटील मापारी आणि रोजगार सेवक दिनकर पाटील मापारी यांना लग्नाच्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

## छत्रपती संभाजी महाराजांची संपूर्ण कारकीर्द तेजोमय-प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**



छत्रपती शिवाजी महाराजानंतर हिंदवी स्वराज्याची धुरा सक्षमपणे आपल्या हातात घेऊन संपूर्ण हिंदुस्तानला चकित करायला लावणारा प्रचंड पराक्रम छत्रपती संभाजी महाराजांनी केला. छत्रपती संभाजी महाराजांची संपूर्ण कारकीर्द तेजोमय होती, असे गौरवद्गार प्राचार्य डॉ चंद्रसेन कोठावळे यांनी काढले. येथील शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये अजिंक्य योद्धा छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली त्यावेळी प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

आपल्या कारकिर्दीत १२० लढाया करणारे आणि त्या सर्वच्या सर्व लढाया जिंकणारे मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस प्रारंभी पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी त्यांना अभिवादन केले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे पुढे म्हणाले की, ३२ वर्ष आयुष्य लाभलेले छत्रपती संभाजी महाराज यांनी नऊ वर्ष उत्कृष्टपणे राज्यकारभार केला. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असामान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा, अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृत पंडित, धर्माभिमानी, व्यासंगी, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, बुद्धी चातुर्य, युद्धनीती आणि स्वराज्यनिष्ठा अशा अनेक क्षेत्रात छत्रपती संभाजी महाराज यांनी आपले निर्विवाद वर्चस्व गाजवले. कार्यक्रमाचे नेमके प्रास्ताविक डॉ. गांधी बाणायत यांनी केले तर कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ. भगवान जायभाय यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. संतोष चव्हाण यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ. सुरेश नलावडे, डॉ. सुभाष पोटभरे, डॉ. उत्तम जाधव, डॉ. तुकाराम गावंडे, प्रा. संदीप सातोणकर, डॉ. विठ्ठल देखणे, श्री. सतीश वाघ, श्री. श्रीकांत चिंचखेडे, मुरलीधर जिने, मनोज राक्षे आदी उपस्थित होते.

## कोरपना-जिवतीत गॅस घोटाळ्याचा स्फोट?

# OTP घेऊन सिलेंडर गायब; आदिवासी आणि गरीब नागरिकांची फसवणूक असल्याचा संतापजनक आरोप!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जिवती । आषीश नामावाड**

कोरपना-जिवती तालुक्यात गॅस वितरण व्यवस्थेतील भोंगळ कारभारामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः आदिवासी, अशिक्षित, शेतकरी आणि मजूर कुटुंबांना लक्ष्य करून जढझ च्या नावाखाली फसवणूक केली जात असल्याचे गंभीर आरोप समोर येत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक गावांमध्ये नागरिकांकडून नियमितपणे गॅस बुकिंग करून घेतले जाते. त्यानंतर ग्राहकांच्या मोबाईलवर आलेला जढझ डिलिव्हरी बॉय स्वतः पाहून घेतो आणि थोड्या वेळात सिलेंडर मिळेल असे सांगतो. मात्र जढझ घेतल्यानंतर अनेक गरीब कुटुंबांना सिलेंडरच मिळत नसल्याची धक्कादायक बाब समोर



आली आहे.

यामुळे आता मोठा प्रश्न उपस्थित होत आहे की, जर या प्रकाराशी एजन्सी मालकांचा कोणताही संबंध नसेल, तर डिलिव्हरी बॉयमध्ये अशा प्रकारे गरीब आणि अशिक्षित नागरिकांची फसवणूक करण्याची हिंमत येते कुठून? दरम्यान, अनेक नागरिक एजन्सीचे वारंवार फेरे मारत असूनही त्यांना समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याची तक्रार आहे. दुसरीकडे काही ठिकाणी गॅस सिलेंडर जादा दराने विकले जात असल्याची चर्चा ग्रामीण भागात जोर धरू लागली आहे. त्यामुळे संपूर्ण वितरण व्यवस्थेवरच संशय व्यक्त केला जात आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील अशिक्षित नागरिकांना लक्ष्य करून सुरू असलेला हा कथित प्रकार तात्काळ थांबवण्यात यावा, संबंधित एजन्सी आणि डिलिव्हरी व्यवस्थेची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. जढझ घेतला... पण सिलेंडर कुठे गेला? कोरपना-जिवतीतील गरीब नागरिकांचा प्रशासनाला थेट सवाल!

# सिंदखेड पोलिसांना गुन्हा नोंदवण्याचे न्यायालयाचे आदेश

## बनावट कागदपत्रांद्वारे लाटला पीक विमा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

प्रधानमंत्री फसल विमा योजनेअंतर्गत बनावट कागदपत्रांच्या आधारे विमा लाटल्याचा एक गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात माहूर येथील न्यायालयाने सिंदखेड पोलिसांना आरोपींविरुद्ध तात्काळ एफआयआर दाखल करून सखोल तपास करण्याचे आदेश दिले आहेत. या पीक विमा घोटाळ्यामुळे संपूर्ण तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.



प्रथमेश प्रमोद उपगनलावार यांनी न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, वाई बाजार येथील गट क्रमांक २०० आणि २०१ ही जमीन त्यांच्या कुटुंबाच्या मालकीची आहे. मात्र, साजिद माजिद खान आणि मोईन माजिद खान यांनी या जमिनीबाबत

बनावट कागदपत्रे तयार करून शासनाची फसवणूक केली. विमा कंपनीच्या काही कर्मचाऱ्यांशी संगनमत करून खरीप हंगाम २०२४ साठी विमा दावा मंजूर करून घेतल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

खोटे फोटो वापरून लाटली रक्कम तक्रारीतील धक्कादायक बाब म्हणजे, आरोपींनी संबंधित गटांसाठी अनुक्रमे १७ हजार ७३४ रुपये आणि ९ हजार ९८१ रुपये विमा रक्कम मिळवली. ही रक्कम पदरात पाडून घेण्यासाठी दुसऱ्याच शेतातील पिकांचे फोटो वापरून खोटे पुरावे सादर करण्यात आले होते. यापूर्वी अर्जदाराने पोलीस अधीक्षक आणि स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार केली होती, मात्र कारवाई न झाल्याने त्यांनी न्यायालयात धाव घेतली. प्रकरणाची गांभीयार्ने दखल घेत न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग बी. ए. अग्रवाल यांनी महत्त्वपूर्ण निरीक्षणे

नोंदवली. हा केवळ खाजगी जमिनीचा वाद नसून सरकारी योजनेतील निधीच्या गैरवापराशी संबंधित गंभीर गुन्हा आहे. सादर केलेली कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्र पाहता प्रथमदर्शनी फसवणूक, बनावटगिरी आणि कटकारस्थान दिसून येत आहे.

न्यायालयाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १७५ (३) अंतर्गत सिंदखेड पोलिसांना या प्रकरणातील संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या घोटाळ्यात विमा कंपनीचे कोणते कर्मचारी सामील आहेत आणि हे रॅकेट किती मोठे आहे, हे आता पोलीस तपासानंतर स्पष्ट होईल.

# मरखेल पोलीस ठाण्यात एपीआय रवी हुंडेकर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**हणेगाव । संतोष चिद्रावार लोणीकर**

मरखेल पोलीस ठाणे येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. रवी हुंडेकर यांचा वाढदिवस उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. कर्तव्यदक्ष, शांत स्वभावाचे व जनतेशी आपुलकीने वागणारे अधिकारी म्हणून ओळख असलेल्या हुंडेकर साहेबांवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते साहेबांना फेटा बांधून, पुष्पगुच्छ व हार अर्पण करून सत्कार करण्यात आला. तसेच केक कापून वाढदिवस आनंदात साजरा करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी हुंडेकर साहेबांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत त्यांना पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष उमाकांत पंचगले, पत्रकार भगवान काळे, संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष व लोकनेता चे हनेगाव प्रतिनिधी संतोष चिद्रावार, पत्रकार मोहसीन मुजावर तसेच लोणी येथील मानसी अर्बन बँकेचे संस्थापक नारायण शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात आपुलकीचे वातावरण निर्माण झाले असून उपस्थितांनी साहेबांसोबत आनंदाचे क्षण अनुभवले.

## ऑपरेशन कॅकडाऊन अंतर्गत किनवट पोलिसांची अंबाडी येथे अवैध दारू विक्रेत्यावर धाड

# १५ हजाराहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त आरोपीविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

किनवट अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या ऑपरेशन क्रॅकडाऊन मोहिमेअंतर्गत किनवट पोलिसांनी अंबाडी येथे धाड टाकत अवैध देशी-विदेशी दारू विक्री करणाऱ्या आरोपीवर कारवाई केली. या कारवाईत अंदाजे १५ हजार १४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १००/२०२६ नुसार महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार डगवाल यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १३ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ८:२० वाजण्याच्या सुमारास मौजे

अंबाडी, ता. किनवट येथे आरोपी रामप्रसाद दर्शनलाल जैस्वाल याच्या राहत्या घरावर छापा टाकण्यात आला. यावेळी घरामध्ये अवैधरित्या साठवून ठेवलेली देशी व विदेशी दारू आढळून आली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत संपूर्ण मुद्देमाल जप्त केला.

ही कार्यवाही पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सागर झाडे यांच्या नेतृत्वात हेड कॉन्स्टेबल डुकरे पोलीसहेड कॉन्स्टेबल डगवाल हेडकॉन्स्टेबल पुरी पोलीस शिपाई अन्नमवार पोलीस शिपाई अनंतवार व महिला पोलीस शिपाई जोणगेवाड यांच्यातर्फे करण्यात आली.

किनवट पोलिसांकडून अवैध दारू व्यवसाय, जुगार व इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात सुरू असलेल्या कारवायांमुळे अवैध व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. ऑपरेशन क्रॅकडाऊन अंतर्गत पुढील काळातही अशाच धडक कारवाया सुरू राहणार असल्याचे पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी सांगितले.



# भरधाव ट्रकची बुलेटला जोरदार धडक; १७ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू, मित्र गंभीर जखमी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपुर । सिद्धेश्वर केंद्रे**

तालुक्यातील गडचांदूर-भोयगाव मार्गावर कवठाळा गावाजवळील 'जयहिंद कॉटन जिनिंग' परिसरात बुधवारी (१३ मे) सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात एका १७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून दुसरा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.


मृत तरुणाचे नाव श्रेयश गुरुदास झोडे (वय १७, रा. चकफुटाना ता. पोंभूर्णा) असे असून जखमी तरुण वेदांत महेश दुमणे (वय १७) याच्यावर चंद्रपूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शाळेला सुट्ट्या असल्याने दोन्ही तरुण मामाच्या गावी कोरपना तालुक्यातील कोराडी येथे आले होते. बुधवारी सायंकाळी कवठाळा येथे कामानिमित्त जात असल्याचे सांगून ते रॉयल एनफिल्ड बुलेट क्रमांक MH/34/CU/0493 ने निघाले होते. सायंकाळी अंदाजे ६.३० ते ७ वाजताच्या दरम्यान कवठाळा गावाजवळील जयहिंद कॉटन जिनिंग परिसरात त्यांच्या दुचाकीला ट्रक क्रमांक MH/40/BL/5976 ने जोरदार धडक दिली.

अपघाताची माहिती मिळताच नातेवाईक घटनास्थळी पोहोचले असता दोन्ही युवक रस्त्याच्या कडेला गंभीर जखमी अवस्थेत पडलेले दिसून आले. दोघांच्याही डोक्याला गंभीर मार लागला होता व मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. तसेच दुचाकी रस्त्याच्या कडेला पडलेली होती, तर संबंधित ट्रक जिनिंगच्या गेटजवळ उभा दिसून आला.

स्थानिक नागरिकांच्या मदतीने दोघांनाही तातडीने गडचांदूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तपासणीनंतर डॉक्टरांनी श्रेयश झोडे याला मृत घोषित केले. वेदांत दुमणे याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी चंद्रपूर येथे हलविण्यात आले.

दरम्यान, हा अपघात ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचा आरोप करण्यात येत असून अपघातानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.:



एकाचा मृत्यु, एक जखमी


तालुक्यातील गडचांदूर-भोयगाव मार्गावर कवठाळा गावाजवळील 'जयहिंद कॉटन जिनिंग' परिसरात बुधवारी (१३ मे) सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात एका १७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून दुसरा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मृत तरुणाचे नाव श्रेयश गुरुदास झोडे (वय १७, रा. चकफुटाना ता. पोंभूर्णा) असे असून जखमी तरुण वेदांत महेश दुमणे (वय १७) याच्यावर चंद्रपूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शाळेला सुट्ट्या असल्याने दोन्ही तरुण मामाच्या गावी कोरपना तालुक्यातील कोराडी येथे आले होते. बुधवारी सायंकाळी कवठाळा येथे कामानिमित्त जात असल्याचे सांगून ते रॉयल एनफिल्ड बुलेट क्रमांक MH/34/CU/0493 ने निघाले होते. सायंकाळी अंदाजे ६.३० ते ७ वाजताच्या दरम्यान कवठाळा गावाजवळील जयहिंद कॉटन जिनिंग परिसरात त्यांच्या दुचाकीला ट्रक क्रमांक MH/40/BL/5976 ने जोरदार धडक दिली.

अपघाताची माहिती मिळताच नातेवाईक घटनास्थळी पोहोचले असता दोन्ही युवक रस्त्याच्या कडेला गंभीर जखमी अवस्थेत पडलेले दिसून आले. दोघांच्याही डोक्याला गंभीर मार लागला होता व मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. तसेच दुचाकी रस्त्याच्या कडेला पडलेली होती, तर संबंधित ट्रक जिनिंगच्या गेटजवळ उभा दिसून आला.स्थानिक नागरिकांच्या मदतीने दोघांनाही तातडीने गडचांदूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तपासणीनंतर डॉक्टरांनी श्रेयश झोडे याला मृत घोषित केले. वेदांत दुमणे याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी चंद्रपूर येथे हलविण्यात आले.दरम्यान, हा अपघात ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचा आरोप करण्यात येत असून अपघातानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.


## लोणी येथे शनि जन्मकाळ शनि अमावस्या निमित्त विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क


**हणेगाव । संतोष चिद्रावार लोणीकर**

लोणी येथे शनिवार दिनांक १६ मे रोजी दुर्मिळ असा शनि जन्मकाळ शनि अमावस्या योग तब्बल तेरा वर्षांनंतर येत असल्याने विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र योगाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

शनिवारी दुपारी ठीक १२ वाजता शनि महाराजांचा गुलाल कार्यक्रम पार पडणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असेही सांगण्यात आले आहे.

सध्या मेष, मीन, कुंभ, सिंह व धनु राशींवर शनीची दशा सुरू असल्याचे मानले जात असून संबंधित राशीतील भाविकांनी तेल दान, अन्नदान, पाणीदान तसेच शनि महाराजांची सेवा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, या धार्मिक कार्यक्रमासाठी आयोजक म्हणून संजय स्वामी व अविनाश स्वामी हे परिश्रम घेत असून सर्व भाविकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून धार्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

करडखेड (ता. देगलूर) येथील छत्रपती संभाजी राजे चौकात संभाजी ब्रिगेड देगलूरच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांची ३६९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी डॉ. सुनील जाधव यांनी जिजाऊ वंदना सादर करून मानवंदना दिली.

मोठ्या संख्येने उपस्थित माँ जिजाऊ, शिव व शंभूप्रेमींनी छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले.यावेळी सदाशिव पाटील सुगावे, कैलास भाऊ यसगे, ॲड. अंकुश राजे जाधव, बालाजी जाधव आंदेगाववाडीकर आणि जयदीप वरखिंडे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाला संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष जेजेराव पाटील शिंदे, शिवसेना युवासेना जिल्हाध्यक्ष नामदेव पाटील थडके, देगावकर विधानसभा अध्यक्ष देवीदास थडके, तालुकाध्यक्ष शहाजी बाबरे, बालाजी पाटील



कुशावाडीकर, बालाजी पाटील सांगवीकर, रणजीत हिंगोले, राज देशमुख करडखेडकर, डॉ. सुनील जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष अहमद कुरेशी, बालाजी इबितवार, फैयाज शेख, सुनील शिंदे, राज पाटील शिंदे करडखेडकर यांच्यासह महिला भगिनी व सर्व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच जयदीप वरखिडे, ज्ञानेश्वर बिरादार सर, जानते सर, मिलिंद वाघमारे (कावळगावकर), बालाजी पाटील (अमदापुरकर), मिरज सपनुरे (अमदापूरकर), बीट जमादार सगरोळीकर साहेब व त्यांचे सहकारी बंकलवार साहेब, नरसिंग महाराज करडखेडवाडी, शैलेश शिंदे, वैभव शिंदे बालाजी इबितदार

आदींची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन जेजेराव पाटील शिंदे यांनी केले.

# विविध परीक्षामध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थी व पालकांचा नागरसोगा ग्रामपंचायत कडून भेटवस्तू देऊन सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**औसा । महेश कोळी**

औसा तालुक्यातील नागरसोगा येथील ग्रामपंचायत कडून गावातील विद्यार्थ्यांनी विविध परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल पालकांसह मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दहावी बारावी परिक्षेत यश तसेच वैद्यकीय परीक्षा ऊतीर्ण होऊन एम. बी. बी. एस पदवी घेतलेली विद्यार्थीनी राज्य स्तरीय बाल कुस्ती स्पर्धेत कास्य पदक पटकवलेला विद्यार्थी आणि कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून गणित विषयात विद्यार्थ्यांना १०० पैकी ९९ गुण मिळवून देणाऱ्या शिक्षिका यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. सरोजा भास्कर सुर्यवशी या तर प्रमुख पाहुणे म्हणून गावातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.नागरसोगा ग्रामपंचायत कडून गावातील दहावी



बारावी परिक्षेत यश तसेच वैद्यकीय परीक्षा ऊतीर्ण होऊन एम. बी. बी. एस पदवी घेतलेली विद्यार्थीनी सगुणा बालाजी शिंदे हीचा सत्कार करण्यात आला.

राज्य स्तरीय बाल कुस्ती स्पर्धेत गावतील बाल कुस्तिवीर हरिश्चंद्र विकास कोळी ह्याने कास्य पदक पटकावल्याबध्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थी आणि कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून गणित विषयात विद्यार्थ्यांना १०० पैकी ९९ गुण मिळवून देणाऱ्या शिक्षिका सौ. श्रद्धा सागर जवादे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. नुकत्याच झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत गावातील जिल्हा परिषद शाळेमधून प्रतिज्ञा मारुती शिंदे हिने ८२.८० %मिळवून प्रथम क्रमांक मिळवला मेघा मोहन घोडके हिने ८२.२०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला तर प्रतिक्षा बालाजी पटवारी हिने ८०% गुण मिळवून तृतीय क्रमांक शाळेतून मिळवला. तसेच संस्कार कमलाकर निसाले ह्याने गणित विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवून तालुक्यात पहिला क्रमांक मिळवला. गौरवी भागवत साळुंके हिने गणित विषयात १०० पैकी ९२ गुण मिळविले. जान्हवी राजकुमार फावडे हिने १०० पैकी ८८ गुण, तसेच प्रिया जयजित फावडे हिने ९४.८०% गुण मिळवले. महेश मदन फावडे ह्याने गणित विषयात ,१०० पैकी ८४ गुण मिळवले, अस्मिता भगीरथ सूर्यवंशी हिने गणित विषयात १०० पैकी ८३ गुण मिळवले. संस्कार विजयकुमार जवादे त्यांच्या ह्या यशाबद्दल या सर्व विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उपसरपंच बंडू मसलकर ग्रामपंचायत सदस्य भास्कर सूर्यवंशी महेश साळुंखे अशोक अडसुळे पूजा जवादे मोहिनी घोडके चेअरमन यशवंत शिंदे माजी सरपंच चंद्रकांत जवादे धीरज पाटील बालाजी सूर्यवंशी तानाजी फावडे दिलीप सूर्यवंशी राजकुमार पावडे बबन सूर्यवंशी यांच्यासह गावातील नागरिक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी भास्कर सूर्यवंशी श्रद्धा जवादे सगुना शिंदे महेश साळुंखे यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रवीण मुसांडे यांनी व्यक्त मानले.

# गिरीजा स्विमिंग पूलमध्ये बुडून नऊ वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

शहरातील नव्याने सुरू करण्यात आलेल्या गिरीजा वॉटर स्विमिंग पूलमध्ये एका नऊ वर्षीय बालकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरवारी ता. १४ मे रोजी दुपारच्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त केली जात असून स्विमिंग पूलमधील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सक्षम नागराज गायकवाड (वय ९ वर्षे) हा बालक त्याच्या आई सोबत हिमायतनगर येथे एका लग्न समारंभावरून आई सोबत आला होता. त्याच्या हट्टापोटी पोहण्यासाठी आई ने गिरीजा वॉटर स्विमिंग पूलमध्ये नेले असता मागील १ तासापासून मुलगा बाहेर न आल्यामुळे पोहत असताना तो



अचानक तो पाण्यात बुडाला. काही वेळानंतर उपस्थितांच्या लक्षात ही बाब येताच परिसरात एकच गोंधळ उडाला. नागरिकांनी तत्काळ बालकाला पाण्याबाहेर काढून उपचारासाठी हिमायतनगर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून सक्षमचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. सक्षम हा आई वडीलास एकूलता एक मुलगा होता.

या घटनेनंतर बालकाच्या कुटुंबीयांनी मोठा आक्रोश केला. स्विमिंग पूल परिसरात कोणतीही योग्य सुरक्षा व्यवस्था नसल्याचा आरोप मृत बालकाच्या आई व नातेवाईकांने केला आहे. स्विमिंग पूल परिसरात प्रशिक्षित लाईफगार्ड, सुरक्षा साधने किंवा लहान मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी कर्मचारी नसल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी स्विमिंग पूलकडे धाव घेतली. या घटनेमुळे शहरात शोककळा पसरली असून संबंधित स्विमिंग पूल प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणी पुढील तपास सुरू असल्याची माहिती मिळाली आहे

## पळसा येथे एकाच कामाचे दोनदा मोजमाप (एमबी) प्रकरण; दोषी अधिकाऱ्याला बडतर्फ करण्याची केदार दायमा यांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । चंद्रकांत भोरे**

हदगाव तालुक्यातील पळसा येथे रस्त्याच्या कामात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप समोर आला आहे. एका कामाचे दोनदा मोजमाप (एमबी) करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार केदार दायमा यांनी मा.तहसीलदार तसेच मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सविस्तर तक्रार सादर केली असून संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी केली आहे.निवेदनानुसार, पळसा गावातील रस्त्याचे काम करण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात एकाच कामासाठी दोन वेगवेगळे मोजमाप पुस्तके (एमबी) तयार करून बिल काढण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होण्याची शक्यता असून हा प्रकार आर्थिक गैरव्यवहाराच्या श्रेणीत मोडतो, असे दायमा यांनी स्पष्ट केले आहे.या संदर्भात त्यांनी संबंधित कागदपत्रे व पुरावे जोडून प्रशासनाकडे तक्रार दाखल केली आहे. तसेच, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. एकाच कामाचे दोनदा मोजमाप करणे म्हणजे थेट भ्रष्टाचार आहे. अशा अधिकाऱ्यांमुळे शासनाची प्रतिमा मलिन होत असून जनतेचा विश्वास कमी होतो, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता प्रशासनाने तात्काळ चौकशी सुरू करावी आणि संबंधित अधिकाऱ्याला निलंबित किंवा बडतर्फ करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडूनही होत आहे. जर या प्रकरणाकडे दुर्लक्ष झाले, तर आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.सध्या या तक्रारीनंतर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दोषींवर कठोर कारवाई झाल्यास भविष्यात अशा प्रकारच्या गैरप्रकारांना आळा बसू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933